# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-०६** **दिनांक - ०८/०१/२०२४**

## Credit Card Department मधुन बोलत असल्याचे सांगून फसवणुक...
## १,००,७९१/- रु.रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विरार परिसरातील श्री. धनेश पाटील यांना क्रेडीट कार्ड डिपार्टमेंट मधून बोलत असल्याचे भासवून केवायसी अपटेड करण्याचे सांगून त्यांची वैयक्तीक माहिती घेवुन अनोळखी लिंक पाठवून त्याद्वारे १,००,७९१ रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रार सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त होती.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक - २९६७-बी/२०२३ दि.११/१२/२०२३)**

नमुद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत **No Broker** च्या खात्यावर गेल्याचे दिसून आले. तात्काळ **No Broker** या कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन नमुद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली व पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.**
- **Bank Debit Card Number,CVV, Pin, OTP etc.. संदर्भातील माहिती कोणाकडेही उघड करु नये.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू न का.**
- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, पोअं/प्रविण आव्हाड, गणेश इलग, कुणाल सावळे, प्रशांत बोरकर व मपोअं/पल्लवी निकम यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

-----------ooooooo----------